MHKO090000852020

## नियमित दिवाणी दावा क्र. ३७/२०२० मधील नि.क्र. ५ खालील आदेश

१. दावा व अर्जातील कथनांचे अवलोकन केले. विद्यावंत वकील श्री. आर. आर. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दावा हा हक्कज्ञापनाकरिता व कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी असे दिसून येते की नि. २२ वर न्यायालयाने आदेश करून दावा जमिनीमध्ये महिलांनी सार्वजनिक मुतारी व संडासबाबत 'जैसे थे' ठेवणेचा आदेश केला आहे. सदरचा 'जैसे थे' आदेश आज अखेर वाढविणेत आला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्यास कैफियत व नि. ५ ला म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादी हे शासकीय अधिकारी असलेने दावा जमिनीमधील महिलांची सार्वजनिक मुतारी व संडास बेकायदेशीरपणे केव्हा पाडतील हे सांगता येत नाही. जर मुतारी व संडास पाडला तर वादींचे नुकसान होऊन त्यांना नैसर्गिक विधीस अडचण होणार आहे. सबब, नि. ५ चे अथवा दाव्याचे निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई आदेश कायम करणेत यावा अशी विनंती वादींनी केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी आपले म्हणणे दाखल केलेले नाही. दाव्यातील कथने व प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की दावा जमिनीमधील संडास व मुतारीचा वापर नैसर्गिक विधीकरिता वादी करतात व प्रतिवादी हे त्यास हरकत अडथळा करत आहे. वादींचे जे म्हणणे आहे त्याला सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा व फोटो वादींनी हजर केला आहे. तो विचारात घेता व वादींची कथने विचारात घेता मी या अनुमानास येते की सकृतदर्शनी प्रतिवादी हे दावा जमिनीतील वादींचे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत हे वादींनी सिध्द केले आहे. जर तुर्तातुर्त मनाई आदेश कायम केला नाही तर प्रतिवादी हे दावा जमीन पाडू शकतात व त्यामुळे वादींना नैसर्गिक विधीस अडचण होणार आहे. त्यामुळे वादींचे पैशाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी हे तुर्तातुर्त मनाई आदेश

या दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत मिळणेस पात्र आहेत या अनुमानास मी येते. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करते -

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. दावा मिळकत गट क्र. ४३४ मधील सार्वजनिक स्वच्छतागृह (मुतारी व संडास) निष्काषित / पाडून टाकू नये असा जो एकतर्फा तुर्तातुर्त मनाई आदेश झाला आहे तो दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत कायम करणेत आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Yamini Dilip Boravke
Date: 2021.03.25 17:22:30 +0530

दिनांक – २५.०३.२०२१

(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गडहिंग्लज